RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**मुंबईच्या तलाव क्षेत्रात पावसाची एंट्री**
पान २ पाहा

मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक- संजय मंगेश भैरे
वर्ष: ९ अंक : ३० ■ मुंबई, मंगळवार १८ ते २४ जून '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

**वायकरांचे मेहुणे मंगेश पांडिलकरांवर ईव्हीएमशी छेडछाड केल्याचा आरोप**
पान ३ पाहा

## मुंबईत पाणी संकट अधिक गडद होण्याची शक्यता



■ **मुंबई**

मुंबईतून मान्सून दाखल होऊन आठवडा उलटून गेला तरीही मुंबई आणि परिसराला जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. कारण मुंबईत एकूण पाणीपुरवठा करणाऱ्या सात जलाशयांमध्ये 5.38 टक्के इतकाच पाणीसाठा आहे. येत्या काही दिवसांत सातही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला नाही तर मुंबईवरील पाणीकपातीचे संकट आणखी गडद होण्याची भीती आहे.1 जूनपासून मुंबईत 10 टक्के पाणीकपात सुरुच आहे.

मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, विहार, तुळशी आणि राज्य सरकारच्या अप्पर वैतरणा, भातसा या सात तलावांतून मुंबईला पाणीपुरवठा होतो. या तलावांची पाणी साठवणक्षमता 14 लाख 47 हजार 363 दशलक्ष लिटर आहे. या तलावांतून दररोज पाणीपुरवठा विविध जलवाहिन्यांद्वारे करण्यात येतो. पावसाची हुलकावणी, वाढलेला उष्मा आणि पाण्याची मागणी आणि तलावांतील पाण्याचे मोठ्या प्रमाणात होणारे बाष्पीभवन यांमुळे तलावांतील पाण्याची पातळी घटली आहे. सध्या मुंबईला 20 ते 22 दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा आहे. मुंबईत पाणी संकट अधिक गडद होण्याची शक्यता अप्पर वैतरणा आणि भातसा जलाशयात शून्य टक्के पाणीसाठा आहे.

आज जलाशयात म्हणून एकूण 77851 दशलक्ष लिटर इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. दररोज 3800 दशलक्ष लीटर एवढा पाणीपुरवठा होतो. यामध्ये दहा ते पंधरा टक्के पाणी कपात सध्या करण्यात आली आहे.



# लोकसभेत बालेकिल्ले राखले, विधानसभेच्या तयारीला लागा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे शिवसैनिकांना आदेश

■ **प्रतिनिधी**
**मुंबई**

१९ जून रोजी पार पडणाऱ्या शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापनदिनाच्या तयारीच्या अनुषंगाने पक्षाचे सर्व नेते, मंत्री, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मुंबईत पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना लोकसभा निवडणुकीचा सविस्तर लेखाजोखा मांडला. या निवडणुकीत आपण संभाजीनगर, कोकण, ठाणे पालघर हे सेनेचे सर्व बालेकिल्ले राखले असून आता पूर्ण ताकतीने विधानसभेच्या तयारीला लागा असे आदेश दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या यशाबद्दल सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. मात्र या निवडणुकीत झालेल्या चुका सुधारून आगामी विधानसभा निवडणुकीत अधिक सक्षमपणे तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या. १९ जून या वर्धापनदिनापासून पक्षाची सदस्य नोंदणी पुन्हा सुरू करणे, आपापल्या विभागात मतदारांची नोंदणी करून मतदारयाद्या दुरुस्त करणे, तसेच विभागवार शिवदूतांच्या नेमणुका करणे याला प्राधान्य देण्यास मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी 'संविधान बदलणार' असे खोटे नेरेटिव्ह तयार करून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र हे चित्र फार काळ टिकणार नाही. कारण केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील आपले सरकार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे सरकार आहे. त्यामुळे आशा चुकीच्या नेरेटिव्हची आगामी विधानसभा निवडणुकीत पुनरावृत्ती होऊ द्यायची नाही असा निर्धार व्यक्त करून कामाला लागण्याच्या सूचना शिंदे यांनी केली. तसेच पंढरपूरच्या आषाढी वारीसहित, दहीहंडी, गणपती, दसरा, दिवाळी असे सर्व हिंदूंचे सर्वच सण मोठ्या उत्साहात साजरे करावेत असेही सांगितले. वारीला निघणाऱ्या पालख्यांचे पक्षाच्या वतीने जागोजागी स्वागत करावे तसेच त्यांची सोय करावी असेही आदेश दिले. तसेच गावागावात वाडी वस्तीवर शिवसेनेचे बोर्ड लागावेत, शाखा सुरू कराव्यात असेही सांगितले.

### ठाकरे शिवसेनेपेक्षा स्ट्राइक रेट उत्तम

*या लोकसभा निवडणुकीत आपला स्ट्राइक रेट हा ठाकरे गटापेक्षा उत्तम होता. त्यांनी २२ जागा लढवून ९ जिंकल्या. आपण १५ जागा लढवून ७ जिंकल्या आहेत. त्यामुळे त्यांचा स्ट्राइक रेट हा ४२ टक्के तर आपला ४८ टक्के एवढा आहे. दुसरीकडे मुंबईत त्यांच्यापेक्षा २ लाख जास्त मते आपल्याला मिळालेली आहेत. बाळासाहेबांचे छत्रपती संभाजीनगर आपण राखले असून कोकणातही जनतेने महायुतीलाच साथ दिलेली आहे. त्यामुळे जनता आपल्याला साथ देत आहे. असे असले तरी महायुतीबद्दल या निवडणुकीत निर्माण झालेले चुकीचे चित्र आगामी विधानसभा निवडणुकीत पालटून टाकण्यासाठी आपल्याला अधिक जोमाने काम करावे लागेल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले.*

### शिवसेना राबवणार वृक्षरोपणाची मोहीम

यंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील तापमान प्रचंड वाढले होते. राज्यातील काही भागातील तापमान ५० ते ५२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात शासनाकडून वृक्षारोपण मोहीम राबवली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात १ लाख वृक्ष लावण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. मात्र त्यासोबत अशीच मोहीम पक्षाच्या वतीने राबवण्याचा निर्णय शिवसेनेने घेतला आहे.

---

**प्रियांका वायनाडमधून काँग्रेसच्या उमेदवार**

## राहुल गांधींनी रायबरेलीची जागा स्वत:कडे ठेवली



■ **नवी दिल्ली**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केरळमधील वायनाड मतदारसंघ सोडण्याची घोषणा केली आहे. लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी रायबरेली आणि वायनाडमधून निवडणूक लढवली होती. त्यांनी दोन्ही जागा जिंकल्या आहेत. अशा परिस्थितीत आता राहुल गांधींनी रायबरेलीची जागा स्वतःकडे ठेवली आहे आणि वायनाड सोडले आहेत. प्रियांका गांधी या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या पुढील उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाने घेतला आहे. राहुल गांधी यांनी 2019 मध्ये पहिल्यांदा वायनाडमधून निवडणूक लढवली आणि त्यात ते विजयीही झाले. त्यानंतर अमेठीमध्ये राहुल गांधींना भाजप नेत्या स्मृती इराणी यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. अमेठीतील पराभवानंतर राहुल गांधी वायनाडमधून खासदार राहिले. आता 2024 च्या निवडणुकीत राहुल पुन्हा एकदा दोन जागांवरून लढले. यामध्ये एक जागा वायनाड आणि दुसरी रायबरेली होती. यावेळी राहुल यांना दोन्ही जागा जिंकण्यात यश आले. वायनाडपेक्षा रायबरेलीमध्ये राहुलला मोठा विजय मिळाला आहे.

## विधानसभेसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप ठरले ?

### काँग्रेस - 100, ठाकरे गटाला - 95 , शरद पवार गट- 85



**मुंबई दि १७ | प्रतिनिधी**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आता अवघे तीन-चार महिने शिल्लक राहिले आहेत. लोकसभा निवडणुकीत जागावाटप उशीरा झाल्याचा फटका अनेक उमेदवारांना बसला होता. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने आतापासूनच विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपाची बोलणी सुरु केली आहेत. गेल्या आठवड्यात मुंबईत मविआची बैठक झाली. त्यामध्ये जागावाटपाची प्राथमिक बोलणी झाली. यानंतर मविआच्या विधानसभा निवडणुकीतील जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे.

सूत्रांच्या वृत्तानुसार, विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या वाट्याला सर्वाधिक जागा येण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे 13 खासदार निवडून आले होते. आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष 100 ते 105 जागांवर निवडणूक लढवू शकतो. तर लोकसभा निवडणुकीला 9 जागा जिंकणाऱ्या ठाकरे गटाच्या वाट्याला 90 ते 95 जागा येऊ शकतात. लोकसभा निवडणुकीत 80 टक्क्यांचा सरस स्ट्राईक रेट असणारा शरद पवार गट विधानसभेला 80 ते 85 जागांवर लढू शकतो, असा अंदाज आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये जागावाटप अंतिम करण्यासाठी चर्चेच्या आणखी काही फेऱ्या होणार आहेत. सध्या मविआतील तिन्ही पक्षांनी आपापल्या नेमक्या ताकदीचा अंदाज लावण्यासाठी अंतर्गत यंत्रणा कामाला लावल्या आहेत. ही सगळी माहिती प्राप्त झाल्यानंतर तिन्ही पक्ष पुन्हा एकदा जागावाटपासाठी चर्चेला बसतील.

लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीने घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्रातील लोकसभेच्या एकूण 48 जागांपैकी 30 जागांवर मविआचे उमेदवार विजयी झाले. लोकसभा निवडणुकीपूर्वी राज्यात काँग्रेसला घरघर लागली होती. अनेक बड्या नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली होती. तर पक्षात पडलेल्या फुटीमुळे ठाकरे गट आणि शरद पवार गटाचीही अवस्था तितकीशी चांगली नव्हती. भाजपच्या अजस्त्र यंत्रणेसमोर हे पक्ष कितपत टिकाव धरतील, याबाबत साशंकता होती. मात्र, मविआने 30 जागा जिंकत या सर्व शंका-कुशंका फेटाळून लावल्या. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकाला सामोरे जाताना मविआतील तिन्ही पक्षांचा आत्मविश्वास कैकपटीने वाढला आहे.

### शरद पवार यांचा अनुभव मविआसाठी जमेची बाजू

लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही शरद पवार यांचा अनुभव ही मविआसाठी जमेची बाजू ठरु शकते. लोकसभा निवडणुकीत उमेदवारांच्या निवडीपासून ते प्रचाराच्या रणनीतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नियोजन अचूक ठरले होते. शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यानंतरच मविआला 30 पेक्षा अधिक जागांवर विजय मिळेल, असे भाकीत केले होते. हे भाकीत जवळपास खरे ठरले आहे. लोकसभा निकालाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत निश्चितपणे होईल आणि राज्यात सत्ताबदल अटळ असल्याचा ठाम विश्वास शरद पवार यांनी मविआच्या संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केला होता.

### ठाकरे गटाला मुंबईत जास्त जागा मिळणार

महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांची ताकद कोणत्या भागात आहे यावरुन जागावाटप आणि मतदारसंघ ठरवले जातील. त्यानुसार विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काँग्रेस पक्षाला जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. तर मुंबईत ठाकरे गटाच्या वाट्याला जास्त जागा येऊ शकतात. शरद पवार गट पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात विधानसभेच्या जास्त जागांची मागणी करेल, असा अंदाज आहे.

## मानाच्या 10 पालखीप्रमुखांना आषाढीला पूजेचा मान मिळणार

■ **पंढरपूर**

दरवर्षी आषाढी एकादशीला श्री विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करण्याचा मान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नीचा असतो. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात ही परंपरा आहे. परंतु, यंदा याला जोडूनच एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या वर्षी आषाढीच्या शासकीय महापूजेस 10 मानाच्या पालखी सोहळा प्रमुखांना निमंत्रण दिलं जाणार आहे. मुख्यमंत्र्यांसोबत पालखी प्रमुखांनाही महापूजेचा मान मिळणार आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी हा मोठा निर्णय घेतला आहे.



श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशी महापूजेसाठी मुख्यमंत्र्यांसमवेत प्रथमच राज्यातील मानाच्या दहा पालखी सोहळा प्रमुख आणि संस्थांच्या अध्यक्षांना संधी मिळणार आहे.

यंदा शासनाने पालखी सोहळ्यातील दिंड्यांना 20 हजार रुपये अनुदान देण्याच्या निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील वारकरी संप्रदायाला खुश करण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाचं स्वागत वारकरी संप्रदायाने केलं होतं. त्यानंतर आता दुसरा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आता आषाढीच्या शासकीय महापूजेस 10 मानाच्या पालखी सोहळा प्रमुखांना निमंत्रण दिलं जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यात्मिक आघाडी प्रमुख अक्षय महाराज भोसले यांनी यासाठी पाठपुरावा केल्याने पुन्हा एकदा महायुतीत शिंदे शिवसेनेला मोठा फायदा मिळणार आहे.

### वारकरी खुश

आता विठ्ठलाचा गाभारा आणि सोळखांबी मध्ये ही वाढलेली मानकऱ्यांची संख्या कशी मावणार हा प्रश्न देखील पडणार आहे. दरम्यान, शासनाने आषाढी वारीसाठी सोहळ्यात चालणाऱ्या सुमारे 1500 दिंड्यांना प्रत्येकी 20 हजार रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाचं राज्यातील दिंडी प्रमुखांनी स्वागत केले.

---

## विरोध करण्यापेक्षा धनगर बांधवांसाठी ताकद लावा

### मनोज जरांगेंचा प्रकाश शेंडगेंना सल्ला

**छ.संभाजीनगर दि१७ | प्रतिनिधी**

आम्हाला विरोध करण्यापेक्षा रानावनात राहणाऱ्या धनगरांसाठी, गोरगरिबांसाठी ताकद दाखववी. आम्हाला आरक्षण न मिळावे म्हणून मोर्चे सभा काढण्यापेक्षा इतरांसाठी धनगर बांधवासाठी लढा, असा सल्ला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांना दिला आहे.

अंतरवाली सराटी येथे पाच दिवसांच्या उपोषणामुळे मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालवली होती. यामुळे त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर शहरातील खाजगी रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत. आज त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, शंभूराज देसाई आले त्यांनी शब्द दिला. राजकारण डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करत नाही. सरकारवर विश्वास ठेवावा लागेल. मागेपुढे सरकणे सुरू राहते. एक महिना त्यांना हवा होता तो दिला आहे. आता 13 जुलैपर्यंत काहीच बोलायचं नाही.

### ओबीसी नेत्यांविरोधात बोलणार नाही

जालन्यातील वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी आरक्षणाच्या रक्षणासाठी प्राणांतिक उपोषण सुरु केले आहे. हाके यांच्या उपोषणावर मनोज जरांगे पाटील म्हणाले की, लोकशाहीत सगळ्यांना उपोषणाचा अधिकार आहे. ते आमचे विरोधक नाहीत.



आम्ही ओबीसी नेत्यांविरोधात बोलणार नाही. गावखेड्यात त्यांचे आमचे जवळचे संबंध आहे. त्यांना काय म्हणायचे ते म्हणू द्या, जसे तुमचे लेकरं डोळ्यासमोर आहे तसे दुसरे लेकरं पण बघा. काळजावर हात ठेवून विचार करा, जी लोक विरोधात येतात त्यांचा विचार आम्ही करत नाही, करणारही नाही, असे त्यांनी म्हटले.

### मुख्यमंत्री सगळ्यांचेच

लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री फक्त मराठा समाजाचे आहेत. कारण ते फक्त मराठा समाजाच्या आंदोलनाला वेळ देतात. ओबीसीकडे ढुंकूनही पाहत नाहीत, असे म्हटले होते. यावर मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री थोडं ना जातीचे असतात ते सगळ्यांचेच असतात, असे म्हटले.

## भाजपातर्फे महाराष्ट्रात प्रभारी-सहप्रभारीपदी केंद्रातील दोन खास मंत्र्यांची नियुक्ती

**नवी दिल्ली, दि. १७ | वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात भाजपच्या सर्वाधिक जागा घटल्या. त्यामुळे, स्वबळावर बहुमत मिळवण्याचं भाजपचे स्वप्न भंगले. लोकसभा निवडणुकीतील या पराभवाची कारणमिमांसा आणि मंथन भाजपकडून करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने काही संघटनात्मक बदलही होण्याची दाट शक्यता आहे. त्यातच, महाराष्ट्राच्या प्रभारीपदी केंद्रीय मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे, राज्यातील संघटनात्मक बदलही केली जाण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांसाठी प्रभारी म्हणून केंद्रीयमंत्री भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी म्हणून अश्विनी वैष्णव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपने महाराष्ट्रासह हरयाणा, झारखंड आणि जम्मू व काश्मीर येथे होत असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने प्रभारी व सहप्रभारी यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार, दोन केंद्रीय मंत्र्यांकडे महाराष्ट्राची जबाबदारी देण्यात आली आहे. भूपेंद्र यादव हे विद्यमान केंद्रीयमंत्री असून अमित शाह यांचे खास मानले जातात. यापूर्वी गुजरात आणि बिहारचे प्रभारी म्हणून त्यांनी पक्षाचं काम पाहिले आहे. तर, दुसरे सहप्रभारी अश्विन वैष्णव हे पंतप्रधान नरेंद्र मोदींजे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे, मोदी-शाहांचे दोन शिलेदार आता विधानसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रावर वॉच ठेवणार आहेत. महाराष्ट्रात ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुका होऊ शकतात. कारण, ऑक्टोबरमध्ये विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ संपत आहे. त्यामुळे, लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण करुन आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये ती चूक न करण्याचा भाजपचा प्रयत्न असणार आहे.

भाजपने आगामी 4 राज्यांच्या निवडणुकांसाठी प्रभारी व सहप्रभारी यांची नव्याने नियुक्ती केली. त्यामुळे, राज्यात भाजपमध्ये मोठे बदल होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष व मुंबई अध्यक्षांच्या कामगिरीचा नवीन प्रभारी आढावा घेणार आहेत. त्यानंतर, काही बदलाचे संकेत दिसून येतात. भाजपला राज्यात अपेक्षित यश न मिळाल्याने पक्ष संघटनेत हे मोठे बदल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ 9 जागा जिंकता आल्या. तर, महायुतीला 17 जागांवर यश मिळाले आहे. मात्र, या पराभवानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदावरून पायउतार होण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, त्यांना पक्षाने काम सुरू ठेवण्यास सांगितले.

## आमदार प्रकाश सुर्वेंचे आयोजन ज्येष्ठ नागरिकांची काशी यात्रा



■ **मुंबई**

जाऊ काशी विश्वेश्वराच्या दारी, पुण्य मोक्ष मिळवू पदरी अशी साद घालत मागाठाणे येथील सुमारे २५०० ज्येष्ठ नागरिकांना मोफत काशी विश्वेश्वर यात्रा मागाठाणेचे शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे घडवून आणणार आहेत.

२० जून रोजी दुपारी १२ वाजता बोरिवली येथून विशेष रेल्वेने येथील ज्येष्ठ नागरिक मोफत काशी विश्वेश्वर यात्रेला रवाना होतील. या यात्रेसाठी शिवसेनेच्या प्रत्येक शाखेतून ज्येष्ठ नागरिक व महिलांनी उत्स्फूर्तपणे नोंदणी केल्याचे सुर्वे यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष रेल्वेने आरामदायी प्रवास, चहा, नाष्टा, भोजनाची व्यवस्था, काशी विश्वेश्वर दर्शन, गंगा स्नान, गंगा घाट आरती यांचा समावेश असल्याचे सुर्वे म्हणाले. यात्रेसाठी जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी तारामती चॅरिटेबल ट्रस्ट व आमदार प्रकाश सुर्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, १५ जून रोजी सकाळी ९ ते ५ पर्यंत मोफत आरोग्य तपासणी ठेवण्यात आली आहे.

## थोडक्यात

### विशेष वैद्यकीय मदत कक्षाकडून 258 रुग्णांना जीवनदान

**मुंबई:** निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधि – न्याय विभाग अंतर्गत विशेष राज्यस्तरीय वैद्यकीय मदत कक्ष सुरू केले असून या कक्षाच्या माध्यमातून कॅन्सर, लिव्हर – किडनी ट्रान्सप्लांट, बोनमॅरो ट्रान्सप्लांट सारख्या गंभीर आजार असणाऱ्या 258 रुग्णांच्या शस्त्रक्रिया करुन त्यांना नवीन जीवनदान देण्यात आले आहेत. या शस्त्रक्रियांसाठी 17 कोटी 69 लाख रुपयांची मदत या कक्षाच्या माध्यमातून देण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. निर्बल आणि दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात 10 टक्के बेड आरक्षित ठेवण्यात आले असून त्या बेडवर मोफत तसेच सवलतीच्या दरात चांगले उपचार मिळावे म्हणून राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जानेवारी 2024 पासून हे कक्ष सुरू झाले असून राज्यभरातील धर्मादाय रुग्णालयांनी यात उत्साहाने सहभाग घेतला आहे. कॅन्सर, लिव्हर-किडनी ट्रान्सप्लांट, बोनमॅरो ट्रान्सप्लांट, हृदय प्रत्यारोपन सारख्या गंभीर आजाराच्या शस्त्रक्रियासाठी लाखोंचा निधी लागतो. त्यामुळे हा खर्च सामान्य रुग्णांच्या आवाक्या बाहेर असतो. म्हणून अशा रुग्णांना पुन्हा नवीन जीवन मिळावे यासाठी राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून उपचार तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

### जाहिरात हक्कातून मध्य रेल्वेची 17 कोटी रुपयांची कमाई

**मुंबई:** मध्य रेल्वेने दोन महिन्यात प्रवासी तिकीटांव्यतिरिक्त अन्य माध्यमातून विक्रमी असा १७ कोटी रुपयांचा महसूल मिळविला आहे. त्यामध्ये वार्षिक परवाना शुल्कासह १७ निविदा देऊन केवळ मे महिन्यात ई लिलावाद्वारे १०.३० कोटी रुपये कमाविले आहेत. मध्य रेल्वेकडून रेकवर बाह्य जाहिरातींसाठी कंत्राट दिले जाते. त्याचबरोबर होर्डिंग, स्थानकांवर नॉन डिजिटल जाहिराती, पादचारी पुलांवर जाहिरातींच्या माध्यमातून महसूल मिळविण्याचा मध्य रेल्वेचा प्रयत्न आहे. यंदा त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असून दोन महिन्यातच मध्य रेल्वेच्या तिजोरीत मोठा महसूल जमा झाला आहे. मध्य रेल्वेने मुंबई विभागात कुर्ला कारशेडच्या १२ ईएमयू रेकवर बाह्य जाहिरातींसाठी ३ वर्षांचे कंत्राट दिले आहे. त्यामाध्यमातून मध्य रेल्वेला दरवर्षी ७१ लाख रुपये मिळणार आहेत. तर नाहूर, मानखुर्द, भायखळा येथे प्रत्येकी १ आणि पनवेल येथे ५ नवीन होर्डिंगसाठी करार करण्यात आला आहे.

### पाणी कपातीपासून मुंबईकरांना दिलासा मिळणार

# मुंबईच्या तलाव क्षेत्रात पावसाची एन्ट्री

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची एन्ट्री झाली आहे. सरासरीने अधूनमधून पाऊस पडू लागला आहे. पावसाने तलावक्षेत्रात हजेरी लावल्याने मुंबईकरांना काहिसा दिलासा मिळाला आहे.

गेल्या चार दिवसात सर्वात जास्त १३५ मिमी पाऊस तुळशी तलावात, त्यापाठोपाठ विहार तलावात १३४ मिमी, भातसा तलावात ८८ मिमी, मध्य वैतरणा तलावात ७३ मिमी, मोडक सागर - ६५ मिमी, तानसा - ६४ मिमी आणि अप्पर वैतरणा तलावात सर्वात कमी म्हणजे ४२ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. सातही तलावात गेल्या ९ जूनपासून पाऊस पडायला सुरुवात झाली आहे.

.मुंबईत यंदा चांगला पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मुंबई शहरात दरवर्षी किमान २,२०० ते २,७०० मिमी इतका पाऊस पडतो. मात्र मुंबई महापालिकेकडे या पावसाचे पाणी साठवून ठेवण्याबाबत वेगळे असे नियोजन नाही.

तसेच, सन २००६ पासून राज्यात मोठ्या जागेतील इमारतीच्या ठिकाणी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' योजना राबविण्याबाबत कायदा करण्यात आलेला असताना त्याची अंमलबजावणी करण्यात पालिकेला सपशेल अपयश आले आहे. त्यामुळेच पावसाचे हे पाणी मुंबईतील तुळशी आणि विहार या दोन तलावात त्यांच्या क्षमते एवढेच जमा होते.

तर पवई तलावात पावसाचे पाणी काही प्रमाणात साठवले जात असले तरी या तलावातील पाणी क्षारयुक्त असल्याने ते पिण्यासाठी वापरता येत नाही. त्यामुळे त्या पाण्याचा वापर आरे कॉलनी व जवळच्या काही कंपन्यामध्ये पिण्याच्या व्यतिरिक्त पाण्याची गरज भागविण्यासाठी करण्यात येतो. त्यामुळे मुंबईत पावसाळ्याच्या चार महिन्याच्या मोसमात पडणारे जवळजवळ २२,०० ते २,७०० मिमी इतक्या पावसाचे पाणी विनावापर समुद्रात वाया जात असते.

मुंबईची दररोज ३,८५० दशलक्ष लिटर इतकी आणि ठाणे, भिवंडी महापालिकेची दररोज १५० दशलक्ष लिटर इतकी पाण्याची तहान ठाणे, पालघर, नाशिक जिल्हा परिसरातील अप्पर वैतरणा, तानसा, मोडक सागर, मध्य वैतरणा आणि भातसा हे प्रमुख ५ तलाव भागवत असतात. त्यामुळे हे ५ प्रमुख तलाव आणि मुंबई उपनगर परिसरातील तुळशी आणि विहार हे दोन तलाव असे एकूण सात तलाव पावसाळ्याच्या शेवटपर्यंत म्हणजे १ ऑक्टोबरपर्यंत भरलेले (१४,४७,३६३ दशलक्ष लिटर) असणे आवश्यक असते.

# राज्य शासनाकडून भूखंड अदानी समुहाला नव्हे तर धारावी पुनर्विकास कंपनीला!

### राजकीय आरोपांबाबत डीआरपीतील सुत्रांची माहिती

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



***कुर्ला मदर डेरी जमिनीबाबत स्पष्टीकरण***

*महाराष्ट्र लँड रेवेन्यू ( डिसपोजल ऑफ गव्हर्नमेंट लँड्स) रुल्स 1971 नुसार कुर्ला मदर डेरी येथील जमीन ही महाराष्ट्र शासनाच्या वतीने धारावी डेव्हलपमेंट प्रोजेक्ट यांना हस्तांतरित केली जाणार आहे. त्यामुळे ही जमीन थेट अदाणी समूहाला हस्तांतरित करण्यात येणार असल्याचा आरोप हा तथ्यहीन आणि हास्यास्पद असल्याचे डीआरपीच्या सूत्रांनी सांगितले.*

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट (डीआरपी)/ झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (एसआरए) या कंपन्यांनाच जमीन हस्तांतरित करण्यात आली असून कोणतीही जमीन अदानी समूहाला हस्तांतरित करण्यात आलेली नाही, अशी माहिती डीआरपी मधील सूत्रांकडून देण्यात आली. धारावी पुनर्विकासासाठी विविध जमिनी अदानी समूहाला हस्तांतरित करण्यात आल्याच्या खासदार वर्षा गायकवाड यांच्या आरोपाबाबत सूत्रांकडून ही माहिती देण्यात आली.

धारावीतील जनतेची दिशाभूल करण्यासाठी अपुऱ्या माहितीच्या आधारे केला जाणारा अपप्रचार हा धारावीकरांच्या भविष्याच्या आड येत असल्याचे मतही यावेळेस डीआरपीच्या वरिष्ठ सूत्रांनी व्यक्त केले. तसेच माननीय खासदारांनी केलेले आरोप हे निराधार आणि तथ्यहीन असल्याचे देखील यावेळी स्पष्ट करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शासन आणि अदाणी यांच्या भागीदारीतील कंपनी डीआरपीपीएलच्या माध्यमातून धारावीतील घरे आणि दुकानांचा पुनर्विकास करून त्यांचे हस्तांतरण राज्य शासनाला करणे, इतकीच महत्त्वाची जबाबदारी अडाणी समूहाची आहे. या पुनर्विकसित घरे आणि दुकानांचे हस्तांतर हे राज्य शासनाच्या मार्फत नियमानुसार केले जाणार आहे.

निविदेतील अटीप्रमाणे राज्य शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जमीन डीआरपी आणि एसआरए यांच्याकडेच राहणार मअसून शासनाच्या मागणीनुसार डीआरपीपीएल कडून राज्य शासनाला किंमत अदा केली जाणार आहे. या बदल्यात डीआरपीपीएलला डेव्हलपमेंट राइट्स मिळणार आहेत. निविदेतील कागदपत्रानुसार महाराष्ट्र शासन आपली जमीन डीआरपी/ एसआरएला देऊन या प्रकल्पाला मदत करेल असे स्पष्ट म्हटले आहे.

रेल्वेची जागा निविदा प्रक्रियेच्या पूर्वीच डीआरपीला हस्तांतरित करण्यात आली होती. यासाठी डीआरपीपीएल कडून रेडी रेकनर च्या 170 टक्के अतिरिक्त प्रीमियम देण्यात आला होता.

धारावीतील प्रत्येकाला ( मग तो पात्र असो किंवा अपात्र) घर दिले जाणार, असे महाराष्ट्र शासनाच्या 2022 मधील शासन निर्णयात स्पष्ट केलेले असताना देखील केवळ धारावीतील नागरिकांना भयभीत करण्यासाठी विरोधकांकडून केवळ राजकारणासाठी आणि स्वतःच्या फायद्यासाठी अपप्रचार केला जात आहे. एसआरए प्रकल्पात अपात्र लोकांना घर दिले जात नाही आणि पात्र लोकांना 300 स्क्वेअर फुटचे घर दिले जाते. मात्र धारावी पुनर्विकास प्रकल्प हा एकमेव असा प्रकल्प आहे ज्यामध्ये पात्र अपात्र हा निकष न बघता प्रत्येकाला घर दिले जाणार आहे. तसेच पात्र रहिवाशांना एसआरए च्या निकषांपेक्षा 17% मोठे घर प्रत्येकाला मिळणार आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील नियम आणि अटी जनतेच्या हितासाठी करण्यात आल्या असून यामध्ये लोकांना मोफत किंवा सवलतीच्या दरात घरे, स्टॅम्प ड्युटी आणि प्रॉपर्टी टॅक्स मध्ये सूट, दहा वर्षे मेंटेनन्स मधून सूट आणि सोसायटीच्या भविष्यातील आर्थिक तरतुदीसाठी दहा टक्के वाणिज्यिक वापर अशा अनेक लोकाभिमुख सुविधा या प्रकल्पात दिल्या जाणार आहेत.

# विद्यार्थ्यांना एसटी पास थेट शाळेत मिळणार

- लांब रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचला
- मासिक पासात 66 टक्के दर सवलत

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता एसटी पाससाठी तासनतास रांगेत उभे राहायला लागणार नाही.

नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६ % इतकी सवलत दिली आहे,म्हणजे केवळ ३३ % रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापन कडून पास घेतले जात असत. पण यंदापासून विद्यार्थ्यांना पास साठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा -महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही.

या संदर्भात १८ जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे " एसटी पास थेट तुमच्या शाळेत " हि विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे.

# बीडीडी चाळ पुनर्विकास योजनेतील पात्र रहिवाशांना मिळणार घरभाडे

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांची घरे रिकामी करून घेण्यासाठी मुंबई मंडळाने आता घरभाड्याचा पर्याय निवडला आहे. पात्र रहिवाशांना महिना २५ हजार रुपये घरभाडे देण्यात येणार आहे. आता ११ महिन्यांचे एकत्रित घरभाडे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुसऱ्या वर्षाचेही ११ महिन्यांचे घरभाडे एकत्रित देण्याचे म्हाडाने जाहीर केले आहे.

बीडीडी चाळीचा रखडलेला पुनर्विकास म्हाडाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार सध्या वरळी, ना. म. जोशी मार्ग या तीन बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम मुंबई मंडळाकडून सुरू आहे. टप्प्याटप्प्यात इमारती रिकाम्या करून इमारतींचे पाडकाम करत त्यावर उत्तुंग इमारती बांधण्याचे काम सध्या सुरू आहे. दरम्यान रहिवाशांची पात्रता निश्चित करून त्यांना सोडतीद्वारे पुनर्वसित इमारतीतील घराची हमी देत घरे रिकामी करून घेतली जात आहेत. या पात्र रहिवाशांचे तात्पुरते पुनर्वसन म्हाडाच्या संक्रमण शिबिरात केले जात आहे. पण आता मुंबई मंडळाकडे संक्रमण शिबिरातील गाळेच नाहीत. त्यामुळे मंडळाने आता घरभाडे देत घरे रिकामी करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. पात्र रहिवाशांना दरमहा २५ हजार रुपये असे घरभाडे दिले जाणार आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीला आता सुरुवात केली जाणार आहे. २५ हजार रुपये घरभाडे देत घरे रिकामी करून घेतली जाणार आहेत. दरम्यान एका महिन्याचे घरभाडे देण्याऐवजी वर्षाचे एकत्रित घरभाडे द्यावे अशी रहिवाशांची मागणी होती. त्यानुसार ११ महिन्यांचे एकत्रित तर दुसऱ्या वर्षाचेही ११ महिन्याचे घरभाडे एकत्रित देण्याचा प्रस्ताव मुंबई मंडळाकडून म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्याकडे सादर करण्यात आला होता.

त्यानुसार दोन वर्षांनंतर रहिवाशांना आणखी किती महिने भाड्याच्या घरात रहावे लागणार आहे त्याचा कालावधी लक्षात घेता त्या कालावधीचे घरभाडे एकत्रित दिले जाणार आहे. या प्रस्तावाला मान्यता देण्यात आल्याचे म्हाडा प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

# गोदी कामगारांना मिळालेले फायदे टिकविणे हेच कामगार चळवळी समोर मोठे आव्हान

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

स्वातंत्र्य सेनानी, मुंबईचे माजी महापौर, माजी खासदार व ज्येष्ठ कामगार नेते डॉ. शांती पटेल यांनी ७० वर्ष बंदर व गोदी कामगार चळवळीचे नेतृत्व करून ६२ वर्ष मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विश्वस्तपदी काम केले. त्यांच्या दूरदृष्टीकोणामुळे व अभ्यासू वृत्तीमुळे आज गोदी कामगारांना चांगला पगार, पेन्शन, हॉस्पिटल इ.फायदे मिळत आहेत. गोदी कामगारांना मिळालेले फायदे टिकवणे हेच आज कामगार चळवळी समोर मोठे आव्हान आहे. असे प्रतिपादन अनेक वक्त्यांनीआपल्या अभिवादनपर भाषणात केले.

मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने १३ जून २०२४ रोजी डॉ. शांती पटेल यांचा १० वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. स्मृतिदिनानिमित्त ऑरेंज गेट प्रिन्सेस डॉक जवळील डॉ. शांती पटेल चौकातील नाम फलकाला पुष्पहार घालण्यात आला. तर माझगाव येथील कामगार सदन कार्यालयातील डॉ. शांती पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

डॉ. शांती पटेल यांनी आपल्या कार्यकाळात कामगारांमधून कामगार नेते व कार्यकर्ते निर्माण केले आहेत. डॉ. शांती पटेल यांचा समाजात, राजकारणात व कामगार चळवळीत आपल्या कार्याने चांगला प्रभाव होता. ते नेहमी सांगायचे उद्योग टिकला तर कामगार टिकेल, कामगार टिकला तर संघटना टिकतील. कामगारांच्या मागण्या या कुणाच्या मेहरबानीमुळे नाही तर कामगारांच्या एकजुटीमुळेच मिळतात. डॉ. शांती पटेल यांच्या दूरदृष्टीकोणामुळे व अभ्यासू वृत्तीमुळे कामगारांचा व बंदरांचा विकास झाला आहे. असेही वक्त्यांनी सांगितले.

स्मृतिदिन सभेमध्ये युनियनचे अध्यक्ष अॅड. एस. के. शेट्ये, कार्याध्यक्ष डॉ. यतीन पटेल, जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज, सेक्रेटरी विद्याधर राणे, दत्ता खेसे, विजय रणदिवे, खजिनदार विकास नलावडे, उपाध्यक्ष रमेश कुऱ्हाडे, प्रसिद्धी प्रमुख मारुती विश्वासराव, माजी उपाध्यक्ष संदीप कदम, संघटक चिटणीस निसार युनूस मिर , मुंबई टांकसाळ मजदूर सभेचे पदाधिकारी मुकुंद वाजे, कार्यकर्त्या योगीनी दुराफे, महेंद्र चौगुले आदी मान्यवरांची डॉ. शांती पटेल यांचे कार्य व आठवणीना उजाळा देणारी भाषणे झाली.

# दोन महिन्यांत विनातिकीट प्रवाशांकडून 63.62 कोटी दंड वसूल

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**

मध्य रेल्वेवरील विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी लोकल, मेल-एक्स्प्रेसमध्ये सखोल तिकीट तपासणी करण्यात येत आहे. विनातिकीट प्रवाशांमुळे होणारे उत्पन्नाचे नुकसान आणि तिकीटधारक प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी विनातिकीट प्रवाशांना पकडण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत एप्रिल – मेदरम्यान ९.०४ लाख प्रकरणांमध्ये ६३.६२ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेवरील सुमारे १,८१० लोकल फेऱ्यांमधून दररोज सुमारे ३३ लाख प्रवासी प्रवास करतात. मध्य रेल्वेवर दररोज ६६ वातानुकूलित लोकल फेऱ्या धावतात. यामधून दररोज सुमारे ७८ हजार प्रवासी प्रवास करतात. सुरक्षितता आणि आरामदायी प्रवासासाठी वातानुकूलित लोकलला प्रवाशांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. मात्र वातानुकूलित लोकल, सामान्य लोकलच्या प्रथम श्रेणी डब्यात विनातिकीट प्रवाशांचा प्रवास वाढल्याने, तिकीटधारक प्रवाशांना उभ्याने प्रवास करावा लागतो. तसेच, जादा पैसे मोजून देखील गैरसोयीचा प्रवास होत असल्याने या लोकल आणि डब्यात तिकीट तपासणी करावी, अशा तक्रारी वारंवार मध्य रेल्वेकडे करण्यात आल्या आहेत. तसेच रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी लोकलमध्ये, रेल्वे स्थानकात तिकीट तपासनीस नसतात. त्यामुळे बहुतेक प्रवासी लोकलमधून विनातिकीट प्रवास करतात. वातानुकूलित लोकल आणि सामान्य लोकलच्या प्रथम श्रेणी डब्यात देखील विनातिकीट प्रवासी गर्दी करतात, अशी ओरड प्रवाशांकडून सातत्याने केली जाते. प्रवाशांना उत्तम सेवा देण्याच्या उद्देशाने विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी मध्य रेल्वेच्या तिकीट तपासनीसांनी विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

# 30 सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास फीचा पूर्ण परतावा; शिक्षण संस्थांना 'यूजीसी'च्या सूचना

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



महाविद्यालयात निश्चित झालेला प्रवेश ३० सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास अथवा इतर शिक्षण संस्थेत स्थलांतरित करायचे झाल्यास महाविद्यालय किंवा विद्यापीठाला संबंधित विद्यार्थ्याला त्याने भरलेल्या फीचा संपूर्ण परतावा देणे बंधनकारक आहे, तसेच ३१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द करायचा झाल्यास प्रक्रिया शुल्क म्हणून केवळ एक हजार रुपये कमी करण्याची मुभा राहील, तर ३१ ऑक्टोबरनंतर प्रवेश रद्द करायचा झाल्यास महाविद्यालयांना किती शुल्क कपात करता येईल, याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) धोरण ठरवून दिले आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता शुल्क परताव्याबाबतचे धोरण 'यूजीसी'ने १२ जून रोजी जाहीर केले.

'यूजीसी'ची मान्यता घेतलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांना हा नियम लागू राहील. यात राज्यांच्या कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या शिक्षण संस्थांचाही समावेश असेल. त्यानुसार ३० सप्टेंबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास शुल्कात कपात करता येणार नाही. महाविद्यालयांनी प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्क आणि मूळ कागदपत्रे परत न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. अशा महाविद्यालयांच्या किंवा विद्यापीठाच्या विरोधात विद्यार्थी-पालकांना 'यूजीसी'कडे तक्रार नोंदविता येईल.

# राज्यातील तब्बल 483 गावांना दरडींचा धोका

### रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील ठिकाणे निश्चित

**प्रतिनिधी**
**■ मुंबई**



***ठाण्यात २२ ठिकाणे धोकादायक***

*ठाणे जिल्ह्यात अंबरनाथमधील खोड खुंटीवली, जांबिवली, मोरीवली, भिवंडीतील नागाव, तामघर, शहापूरमधील मोखावणे, ठाण्यातील उत्तण, बेलापूर, भाईंदरपाडा, माजिवडे, कोलशेत, शिरवणे, डोंगरी तर्फे धारावी, पारसिक, मुंब्रा आदी २२ ठिकाणी दरडींचा धोका दर्शविण्यात आला आहे.*

यंदाच्या पावसाळयात राज्यातील ४८३ गावांवर दरडी कोसळण्याचा धोका असून धोकादायक दरडींची ठिकाणे सरकारने सबंधित जिल्हा प्रशासानाला कळवली आहेत. त्यानुसार रायगड, रत्नागिरी, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावांना दरडी कोसळण्याचा सर्वाधिक धोका आहे. दरडींची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून तेथे कुणाला हानी पोहचणार नाही, याची काळजी जिल्हा प्रशासनाने घ्यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

राज्य सरकारने तयार केलेल्या अहवालानुसार राज्यातील डझनभर जिल्हयातील ४८३ गावांवर धोकादायक दरडींचे संकट आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्यात खालापूर, कर्जत, महाड, म्हसळा, पनवेल, पोलादपूर या तालुक्यातील सर्वाधिक १५७ गावांचा समावेश असून त्याखालोखाल रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, दापोली, गुहागर, खेड, राजापूर, रत्नागिरी संगमेश्वर या तालुक्यातील १३८ तर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, हवेली, जुन्नर, खेड, मावळ, मुळशी या तालुक्यातील ९३ गावांना धोकादायक दरडींपासूनच्या आपत्तीचा धोका आहे.

साताऱ्यात जावळी, महाबळेश्वर, पाटण, सातारा, वाई या तालुक्यातील ८८, कोल्हापूरमधील भुदरगड, चंदगड, गगनबावडा, करवीर, पन्हाळा, राधानगरी, शाहूवाडी तालुक्यातील ५८, नगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यील ८ , सिंधुदुर्गातील सावंतवाडी, वैभववाडी या दोन तालुक्यातील १६,नाशिक जिल्ह्यात इगतपुरी, सुगरणा आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ५ गावांना पावसाळयात दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे अहवालात म्हटले आहे.

पावसाळयात राज्यातील काही जिल्ह्यात विशेषत: कोकण, मुंबई, पुणे, कोल्हापूर या भागात दरडी कोसण्याच्या घटना वारंवार घडत असतात, त्यामुळे काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# सत्तारांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा

## भारतीय जनता पक्षाचा आक्रमक पवित्रा



■ सिल्लोड

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी सिल्लोडचे भाजप शहराध्यक्ष कमलेश कटारिया यांनी केली आहे. लोकसभा निवडणुकीत अब्दुल सत्तार यांनी महायुतीच्या विरोधात काम केल्याचा आरोप कमलेश कटारिया यांनी केला आहे. अब्दुल सत्तार यांच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा प्रचार केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

सिल्लोडमधील भाजप संपवण्यासाठी अब्दुल सत्तार यांचा प्रयत्न असल्याचा आरोप देखील कमलेश कटारिया यांनी केला आहे. अब्दुल सत्तारांची मंत्रिमंडळातून हकलपट्टी करण्याच्या मागणीसाठी भाजप पदाधिकाऱ्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र दिले आहे.

जालना लोकसभा मतदारसंघात भाजपचे नेते आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला आहे. काँग्रेस नेते डॉ. कल्याण काळे यांनी त्यांचा पराभव केला आहे. काळेंच्या विजयात अनेक अदृश हातांची मदत झाल्याचे बोलले जात आहे. यामध्ये शिवसेनेचे राज्यातील अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचे नाव घेतले जात आहे. अब्दुल सत्तार यांची आघाडीचे उमेदवार कल्याण काळे यांनी त्यांच्या सिल्लोड येथील संपर्क कार्यालयात जाऊन भेट घेतली. तेव्हा सत्तार यांनी काळेंचे अभिनंदन करत डोक्यावर हात ठेवला होता. एवढेच नाही तर काळे माझे चांगले मित्र आहेत, त्यांना मी निवडणुकीत मदत केल्याची जाहीर कबुलीही सत्तार यांनी दिली होती. या घटनेनंतर भाजपनं आक्रमक पवित्रा घेत सत्तारांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीनंतर अब्दुल सत्तार आणि काँग्रेसच्या नेत्यांमधील जवळीक वाढू लागली आहे. काँग्रेसचे जालन्याचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी नुकतीच अब्दुल सत्तार यांची त्यांच्या सिल्लोड येथील संपर्क कार्यालयात सदिच्छा भेट घेतली होती. भोकरदन शहराला खडकपूर्णा योजनेतून पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी या भेटीत सत्तारांकडे केली. त्यांनी ही मागणी मान्य करुन तत्काळ कारवाई करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यामुळं सत्तार पुन्हा काँग्रेसची वाट धरणार का? असा सवालही यानिमित्तानं उपस्थित केला जात आहे.




## पंकजा मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन करा, अहमदनगरमध्ये बॅनरबाजी

■ अहमदनगर

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर बीडमध्ये मोठा तणाव पाहायला मिळत आहे. बीडमध्ये नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. पंकजा मुंडे यांच्या पराभवानंतर मात्र, त्यांच्या समर्थकांमध्ये तीव्र नाराजी पाहायला मिळत आहे.

अहमदनगरच्या पांगरमल येथील माजी सरपंच बाप्पुसाहेब आव्हाड यांनी पांढरीपूल फाटा येथे पंकजा मुंडे यांच्याबाबत लावलेल्या बॅनरच्या जोरदार चर्चा सुरू आहेत.

सरकारनं जर येत्या विधानसभा मतदानापूर्वी पंकजा मुंडे यांचं राजकीय पुनःर्वसन केलं नाही, तर सकल ओबीसी समाज भारतीय जनता पार्टीसह सत्तेत असणऱ्या कोणत्याही पक्षास मतदान करणार नाही, अशा आशयाचे बॅनर अहमदनगरच्या पांगरमल येथे लावण्यात आले आहेत.

सोबतच पक्षासाठी आणि समाजासाठी ज्यांचं योगदान नाही, त्यांना राज्यसभा देऊन मंत्रिपद दिलं जातं, मात्र पंकजा मुंडे यांना डावललं जातं, असं म्हणत कार्यकर्त्यांनी भागवत कराड यांच्यावर निशाणा साधला आहे.

# वायकरांचे मेहुणे मंगेश पांडिलकरांवर ईव्हीएमशी छेडछाड केल्याचा आरोप

## ईव्हीएम हा भारतातील 'ब्लॅक बॉक्स'- राहुल गांधी



■ नवी दिल्ली

टेस्लाचे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म साईट X चे मालक एलॉन मस्क यांनी ईव्हीएमला हद्दपार करण्याची मागणी केल्यानंतर सर्वाधिक पडसाद भारतात उमटले आहेत. ईव्हीएमवरून देशात सातत्याने संशयाचे वातावरण होत असतानाच आता मस्क यांनी मांडलेल्या भूमिकेनं देशात पुन्हा एकदा ईव्हीएमविरोधात ठिणगी पडली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी महाराष्ट्रात सर्वाधिक वादग्रस्त ठरलेल्या रवींद्र वायकर निकालाचा मुद्दा उपस्थित केला आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X (पूर्वीचे ट्विटर) वर आज (16 जून) एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या पोस्टमध्ये त्यांनी शिवसेनेचे शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्याशी संबंधित एक बातमीही शेअर केली आहे. शिंदे यांच्यावर ईव्हीएममध्ये छेडछाड करून विजयी झाल्याचा आरोप आहे.

राहुल गांधी यांनी ट्विटरवर लिहिले की, "ईव्हीएम हा भारतातील 'ब्लॅक बॉक्स' आहे. त्यांची छाननी करण्यास कोणालाही परवानगी नाही. आमच्या निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. "जेव्हा संस्थांमध्ये उत्तरदायित्वाचा अभाव असतो, तेव्हा लोकशाही एक लबाडी बनते आणि फसवणूक होण्याची शक्यता वाढते."

राहुल गांधींनी ही बातमी शेअर करत पोस्ट लिहिली आहे. ती इंग्रजी वर्तमान पत्राची आहे. या वृत्तात सांगण्यात आले आहे की, आतापर्यंतच्या तपासात वनराई पोलिसांना रवींद्र वायकर यांचे नातेवाईक मंगेश पांडिलकर यांच्याविरोधात अनेक पुरावे सापडले आहेत. मंगेश पांडिलकर यांच्यावर ईव्हीएममध्ये छेडछाड केल्याचा आरोप आहे, त्यानंतर वायकर मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून 48 मतांनी विजयी झाले. मतमोजणीवेळी मंगेश जो फोन वापरत होता, तो इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनला (ईव्हीएम) जोडल्याचा आरोप आहे.

दरम्यान, ईव्हीएम मशीन अनलॉक करण्यासाठी ओटीपी जनरेट करण्यासाठी हा मोबाईल फोन वापरण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. हे तंत्र 4 जून रोजी नेस्को सेंटरमध्ये वापरले गेले. वनराई पोलिसांनी आरोपी मंगेश पांडिलकर आणि दिनेश गुरव यांनाही CrPC 41A नोटीस बजावली होती, जे निवडणूक आयोग (EC) मध्ये एनकोर (पोल पोर्टल) ऑपरेटर होते. पोलिसांनी आता हा मोबाईल फोन फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (एफएसएल) कडे पाठवला आहे, जेणेकरून मोबाईल फोनचा डेटा तपासता येईल आणि फोनवर उपस्थित असलेल्या बोटांचे ठसेही घेतले जात आहेत.

### सुरक्षित ईव्हीएम बनवायला आमच्याकडून शिका

दुसरीकडे, अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी SpaceX चे CEO इलॉन मस्क यांनी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन म्हणजेच ईव्हीएमच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केला आहे आणि त्याचा वापर करू नये असा सल्ला दिला आहे. माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी मस्क यांच्या ईव्हीएमबाबतच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिली असून भारतात ईव्हीएमचा वापर पूर्णपणे सुरक्षित असल्याचे म्हटले आहे. जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींपैकी एक असलेल्या मस्क यांनी ईव्हीएम रद्द केली पाहिजेत, असे म्हटले आहे. माणसांकडून किंवा AI द्वारे हॅक होण्याचा धोका आहे, जरी हा धोका लहान असला तरी तो खूप जास्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मस्क यांच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी लिहिले, ही खूप मोठी टिप्पणी आहे. म्हणजे कोणीही सुरक्षित डिजिटल हार्डवेअर तयार करू शकत नाही, हे चुकीचे आहे. मस्क यांचा दृष्टीकोन यूएस आणि इतरत्र लागू होऊ शकतो, जिथे ते इंटरनेट-कनेक्टेड मतदान यंत्रे तयार करण्यासाठी नियमित संगणकीय प्लॅटफॉर्म वापरतात. पण भारतीय ईव्हीएम हे कोणत्याही नेटवर्क किंवा मीडियापासून खास डिझाइन केलेले, सुरक्षित आणि वेगळे केले गेले आहेत. कनेक्टिव्हिटी नाही, ब्लूटूथ, वायफाय, इंटरनेट नाही. म्हणजे मार्गच नाही. फॅक्टरी प्रोग्राम केलेले नियंत्रक जे पुन्हा प्रोग्राम केले जाऊ शकत नाहीत. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्सची रचना आणि निर्मिती भारताने केली तशीच केली जाऊ शकते. मस्क, ट्यूटोरियल प्रदान करण्यात आम्हाला आनंद होईल.

# ईव्हीएम आणि मोबाईलचा संबंध नाही - निवडणूक अधिकारी वंदना सूर्यवंशी

■ मुंबई



लोकसभा निवडणुकीत केवळ 48 मतांनी विजयी झालेल्या रवींद्र वायकर यांच्या मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघात ईव्हीएमध्ये घोळ झाल्याचा आरोप विरोधी पक्षातील काही नेत्यांनी केला आहे. तसेच, अमोल कीर्तीकर यांच्याकडून यासंदर्भात अर्ज दाखल करण्यात आला आहे. मात्र, दोन दिवसांपूर्वी या प्रकरणात रवींद्र वायकर यांच्या मेव्हण्याची एंट्री झाल्याने आणखी गोंधळ निर्माण झाला आहे. ईव्हीएम अनलॉक करणारा मोबाईल हा रवींद्र वायकर यांच्या मेव्हण्याच्या हाती असल्याची धक्कादायक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. त्यानंतर, विरोधी पक्षातील नेत्यांनी ईव्हीएमच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. त्यामुळे, अमोल कीर्तीकर विरुद्ध रवींद्र वायकर यांच्यातील लढत पुन्हा एकदा चर्चेत आली. त्यावर, आता निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण दिले आहे. ईव्हीएम हे स्वतंत्र डिव्हाईस असून त्याला कुठलीही मोबाईल कनेक्टीव्हीटी नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.

मुंबईतील उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर अवघ्या 48 मतांनी विजयी झाल्यानंतर सुरू असलेला वाद अजूनही कायम आहे. आता या प्रकरणामध्ये धक्कादायक माहिती समोर आली. या प्रकरणात वनराई पोलिसांकडून निवडणूक मतमोजणी प्रक्रियेतील डेटा ऑफरेटरकडून तपास सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. तर, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या आहेत. त्यातच, ट्विटरचे प्रमुख आणि टेस्ला कंपनीचे मालक एलन मस्क यांनीही ट्विट करून ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे, राजकीय नेत्यांनी पुन्हा एकदा उत्तर-पश्चिम मतदारसंघातील विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. त्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली.

डेटा कम्पॅलेशन सिस्टीम आणि ईव्हीएम वेगवेगळे आहे. ईव्हीएमशी डेटा कम्पॅलेशन सिस्टीमद्वारे केवळ वेबसाईटवर डेटा टाकला जातो, त्याच्याशी संबंधित काही ओटीपी मोबाईलवर येतो, त्यासाठी काही मोबाईल होते, त्यापैकीच एक म्हणजे डेटा ऑपरेटर गुरव यांच्याकडेही मोबाईल होता, अशी माहिती वंदना सूर्यवंशी यांनी दिली.

# 'मुलांना दंगलीचे शिक्षण का द्यायचे?'

## पुस्तकातून अयोध्या वाद गाळल्यानंतर संचालकांचे उत्तर

■ नवी दिल्ली

एनसीईआरटीच्या इयत्ता बारावीच्या राजशास्त्राच्या पुस्तकातून अयोध्या वाद आणि बाबरी मशिदीबाबतचे काही ऐतिहासिक संदर्भ वगळण्यात आले आहेत. याची बातमी आज माध्यमांमध्ये आल्यानंतर राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात एनसीईआरटीचे संचालक दिनेश प्रसाद सकलानी यांनी यावर भूमिका मांडली आहे. अभ्यासक्रमाचे भगवेकरण करण्याचा आमचा कोणताही प्रयत्न नाही. तसेच बारावीच्या पुस्तकात केलेले सर्व बदल पुरावे आणि तथ्यांवर आधारित आहेत, असेही त्यांनी सांगितले. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्ये सकलानी म्हणाले, आपण विद्यार्थ्यांना दंगलीबाबतचे शिक्षण का द्यायचे? हिंसा वाढवणे आणि वैफल्यग्रस्त नागरिक निर्माण करणे, हा पाठ्यपुस्तकांचा उद्देश असू शकत नाही. शाळांमध्ये इतिहासाच्या माध्यमातून तथ्ये शिकवली जातात. त्याला रणांगण बनविता कामा नये. द्वेष आणि हिंसाचार हे शाळेत शिकविण्याचे विषय नाहीत. एनसीईआरटीच्या बारावीच्या राज्यशास्त्राच्या पुस्तकातून अयोध्या वादाशी निगडित अनेक संदर्भ वगळण्यात आले होते. पूर्वी हे प्रकरण चार पानांचे होते. ते कमी करून आता दोन पानांचे करण्यात आले आहे. तसेच यातून बाबरी मशिदीच्या नावाला हद्दपार करण्यात आले आहे. त्याठिकाणी तीन घुमटांची वास्तू असे संबोधले गेले आहे.

# टीडीपीला लोकसभा अध्यक्षपद मिळाले नाही, तर इंडिया आघाडी त्यांना पाठिंबा देईल- राऊत

■ मुंबई



लोकसभा अध्यक्षपद एनडीए आघाडीतील नेत्याकडे जावे, असे शिवसेना (यूबीटी) नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की चंद्राबाबू नायडू यांनी लोकसभा अध्यक्षपदाची मागणी केली आहे आणि जर त्यांना हे पद मिळाले नाही तर आम्ही टीडीपी उमेदवाराला इंडिया आघाडीचा पाठिंबा मिळेल याची खात्री करू.

संजय राऊत म्हणाले की, 'लोकसभा अध्यक्षपदाची लढत महत्त्वाची आहे. यावेळी 2014 आणि 2019 सारखी परिस्थिती नाही. सरकार स्थिर नाही. चंद्राबाबू नायडू यांनी लोकसभा अध्यक्षपद मागितल्याचे आम्ही ऐकले आहे. एनडीएच्या उमेदवाराला हे पद मिळाले नाही तर पीएम मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा टीडीपी, जेडीयू आणि एलजेपी (रामविलास) फोडू शकतात. चंद्राबाबू नायडूंना हे पद मिळाले नाही तर त्यांच्या उमेदवाराला भारत आघाडीचा पाठिंबा मिळेल याची आम्ही खात्री करू.

विरोधी आघाडीला उपसभापतीपद मिळाले नाही तर ते लोकसभा अध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर करू शकतात, असे मीडिया रिपोर्ट्स सांगत आहेत. 17 व्या लोकसभेत उपसभापती पद रिक्त होते. लोकसभेचे पहिले अधिवेशन 24 जूनला सुरू होऊन 3 जुलै रोजी संपेल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 27 जून रोजी लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करणार आहेत.

# लोकसभा अध्यक्षपदावर सत्ताधारी पक्षाचा पहिला अधिकार

## जेडीयूने इंडिया आघाडीवर निशाणा साधला

■ नवी दिल्ली



